# महिला शिक्षण आणि महिला सबलीकरण

**प्रा. डॉ. स्मिता दत्तात्रय राणे** प्राचार्या, महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मार्केट यार्ड, कोल्हापूर.
rsmita2970@gmail.com

**सारांश :-**

महिला शिक्षण आणि महिला सक्षमीकरण हे देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहेत. महिलांचे सक्षमीकरण होण्यासाठी शिक्षण जागरूकता प्रशिक्षण आवश्यक आहे. महिला शिक्षित असतील तरच देशाचा कुटुंबाचा विकास होऊ शकतो. महिला सक्षमीकरणामुळे महिलांचा दर्जा वाढतो व त्याच्या क्षमतेची जाणीव होते. त्यांना संधी सुविधा मिळतात, त्यांचा आत्मविश्वास वाढतो, त्या स्वावलंबी होतात. महिला शिक्षण आणि महिला सक्षमीकरण यांचा शिक्षणामुळे महिलांना ज्ञान कौशल्य आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता मिळते. त्यांना सामाजिक रूढींना आव्हान देण्यास आणि सार्वजनिक क्षेत्र सहभागी होण्यास मदत होते. संकुचित वृत्ती कमी होते. म्हणूनच आनंददायी शिक्षणातून महिलांचे सबलीकरण होईल आणि सबलीकरण झाल्याने शिक्षण आनंदही होऊ शकेल.

**प्रस्तावना :-**

मानवी समूहात स्त्री जातीचा महत्वाचा वाटा आहे. परंतु स्त्रियांचा जीवन स्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे ही महत्त्वाची वागणूक स्त्री जातीला मिळत राहिली महिलांनी फक्त चूल आणि मूल याकडेच लक्ष दिले पाहिजे अशी समाजाची धारणा होती पण आता महिलांनी चूल आणि मूल सोबतच देश आणि विदेश याकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे मानवी हक्क विषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्रिया मध्ये निर्धन आणि निरक्ष राहण्याचे प्रमाण मोठे आहे अजूनही बऱ्याचशा क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते आणि घरगुती हिंसाचाऱ्याला बळी पडणाऱ्या स्त्रियांची ही संख्या मोठी आहे स्त्रियांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे ग्रामीण भागात अजूनही स्त्रिया स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत त्यामुळे त्यांची निर्णय क्षमता वाढवणे गरजेचे आहे घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचविले पाहिजे श्री अजूनही 100% सक्षम आहे हे आपण मान्य करू शकत नाही श्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्त्वाचे साधन म्हणजे स्त्री शिक्षण होय स्त्री शिक्षण हा कोणत्याही समाज जीवनाच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे कोणत्याही समाजाची संस्कृती सामाजिक पाते ही समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे त्यावरून ठरवले जाते. शिक्षित महिला के वळ त्यांच्या मुली च्या शिक्षणाला प्रोत्साहन देत नाहीत तर त्यांच्या सर्व मुलांना चांगले मार्गदर्शन देखील करू शकतात.

**महिला शिक्षणाचे महत्त्व :-**

जर तुम्ही एका पुरुषाला शिक्षित केले तर तुम्ही एका व्यक्तीला शिक्षित करता परंतु जर तुम्ही एका महिलेला शिक्षित केले की ती संपूर्ण कुटुंबाला शिक्षित करते जवाहरलाल नेहरू यांच्या मते महिला सक्षम म्हणजे भारत माता सक्षम भारतातील महिला शिक्षण देशाच्या सर्वांगीण विकासात खूप महत्त्वाची भूमिका बजावते ते केवळ अर्ध्या मानवी संसाधनाच्या विकासातच मदत करत नाही तर घरात आणि बाहेर जीवनाचा दर्जा सुधारण्यास मदत करते जर असे म्हटले तर शिक्षण ही सर्व समस्येची गुरुकिल्ली आहे तर ते अयोग्य ठरणार नाही मुलीच्या सक्षमीकरणासाठी समृद्धीसाठी विकासासाठी आणि कल्याणासाठी शिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे महिला शिक्षणामुळे लवकर लग्न होण्याची शक्यता कमी होते आरोग्य आणि सक्षमीकरण सुधारते आर्थिक विकासाला चालना मिळते संकल्पना सिद्धांत आणि कार्यपद्धतीमध्ये अंतर्भूत असलेले अंतर आणि पूर्वग्रह दूर होतात दारिद्र्य निर्मूलनास मदत होते निर्णयामध्ये सहभागी होतात स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबाचे चांगले भविष्य घडवितात आज श्री शिक्षणाचे महत्त्व ओळखणे अत्यंत गरजेचे आहे कारण ते आपल्या मुलांच्या पहिल्या शिक्षिका आहेत ज्या पुढे जाऊन देशाच्या उभारणीला नवी ओळख देतील कोणत्याही मुलाचे भविष्य हे त्याच्या आईने दिलेल्या प्रेमावर आणि पालन पोषणावर अवलंबून असते जे फक्त एक स्त्रीत्व करू शकते प्रत्येक मुलाला त्याच्या आयुष्यातील पहिला धडा त्याच्या आईकडूनच मिळतो म्हणूनच आईने शिक्षित असणे महत्त्वाचे आहे सुशिक्षित महिला केवळ त्यांच्या मुलाचेच नव्हे तर त्यांच्या आजूबाजूच्या अनेक लोकांचे जीवन बदलू शकतात जे देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात

**महिला शिक्षण आणि महिला सक्षमीकरण :-**

महिला शिक्षण म्हणजे मुली व स्त्रियांना शिक्षण देणे समाजात महिलांना सक्षम बनवण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन मानले जाते ते केवळ व्यक्तीचे व्यक्तिमत्व विकसित करत नाही तर आर्थिक सामाजिक सांस्कृतिक विकासातही महत्त्वाची भूमिका बजावते कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सामाजिक शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री पुरुष असमानता नष्ट करणे म्हणजेच स्त्री सक्षमीकरण

**महिला सबलीकरणाची उद्दिष्टे :--**

1. स्त्रियांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देणे.
2. त्यांचा दावा करण्यासाठी सक्षम बनवणे.
3. भेदभाव आणि हिंसाचाराच्या विरोधात उभे राहण्यासाठी सक्षम बनवणे.
4. पूर्णपणे सहभागी नागरिक बनण्यासाठी सक्षम बनवणे.

**महिला सबलीकरण :-**

आपण समाजात महिलांना स्वायत्तता सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबवण्यास सुरुवात करतो. पण याचवेळी या समाजाला प्रश्न विचारावं वाटतो खरच भारतातील महिला आपला आहेत का ज्यामुळे आपण तिला सल्ला बनवण्याचा प्रयत्न करत आहोत आणि खरंच महिलांचे सबलीकरण होते आहे का? वेगाने बदलणारे आजच्या आधुनिक युगात महिला सबलीकरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे महिला सफलीकरण म्हणजे ती स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकते आणि कोणाच्याही शिवाय जीवन जगू शकते महिला सबलीकरण ही काळाची गरज आहे. विश्वातील अर्धी मानवी शक्ती श्री आहे. ती शक्ती देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे असल्याने त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणूनच इसवी सन 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले गेले तसेच भारताने यावेळी भारतानेही 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून जाहीर करून महिलांसाठी वेगवेगळे योजना आखल्या गेल्या .सध्या सरकार द्वारे मातृ दिवस महिला दिन बालिका दिन जननी सुरक्षा अभियान असे कार्यक्रम राबवले जाऊ लागले आहेत याद्वारे समाजात स्त्री शक्तीचे महत्त्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते पण त्याचबरोबर महिलांना शारीरिक सामाजिक आर्थिक व मानसिक स्वरूपात सक्षम बनवणे ही समाजाची जबाबदारी आहे.

*** महिलांना सक्षम बनवण्यात शिक्षणाचे महत्त्व:--**

महिला आणि मुलींना सक्षमीकरणा शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे .शिक्षणामुळे त्यांना स्वायत्तता मिळवणे निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे आणि त्यांच्या समुदायांमध्ये योगदान देणे या सर्व गोष्टी करण्यासाठी आवश्यक असले ले ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करता येतात .शिक्षणाचे महत्त्व आपल्याला माहिती असूनही महिलांना शिक्षणाची समान उपलब्धता मिळवण्यामध्ये बऱ्याचदा अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. उदाहरणात अनेक विकसनशील देशांमध्ये पारंपारिक सामाजिक नियमाने पद्धतीमध्ये शिक्षणात लिंगभेद कायम आहे जसे की लवकर लग्नाने घरगुती जबाबदाऱ्यांचे ओझे याव्यतिरिक्त गरिबी संघर्ष आणि संसाधनाची मर्यादित उपलब्धता यासारखे घटक देखील यावर समानतेला कारणीभूत ठरतात. परिणामी महिला आणि मुलींना त्यांच्या पूर्ण सक्षम तेपर्यंत पोहोचण्याची आणि त्यांच्या पुरुष सम कक्षा सोबत समाजात योगदान देण्याची संधी नाकारली जाते.

शिक्षणामुळे महिलांना व मुलींना ज्ञान मिळवण्यास कौशल्य विकसित करण्यास आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होते. शिक्षण महिला आणि मुलींना सामाजिक रूढी आणि रुढीला आव्हान देण्यास सक्षम करते. त्यांना त्यांच्या हक्कासाठी वकिली करण्यास आणि सार्वजनिक क्षेत्रात सहभागी होण्यास सक्षम करते. याही व्यतिरिक्त चांगल्या नोकऱ्या मिळवण्याच्या उच्च उत्पन्न मिळवण्याच्या आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक दृष्ट्या आधार देण्याच्या संधी प्रदान केल्या जातात.

शिक्षणाचे फायदे आपल्याला माहिती असूनही महिलांना अजूनही बऱ्याचशा अडथळ्यांना तोंड द्यावे लागते .उदाहरणार्थ

**लिंग असमानता :-**

अनेक समाजामध्ये अजूनही लिंग असमानता कायम आहे महिला आणि मुलींना अनेकदा भेदभाव आणि उपेक्षित तेचा सामना करावा लागतो.

सांस्कृतिक अडथळे यामध्ये पारंपरिक पद्धतीचा समावेश होतो जसे की केश मुंडन आणि बालविवाह ज्यामुळे मुलींच्या शैक्षणिक संधीवर मर्यादा येतात.

**गरीबी :-**

महिलांचे शिक्षणामध्ये गरिबीमुळे अनेकदा अडथळे निर्माण होतात कारण काही कुटुं बाना शिक्षण गणवेश आणि वाहतुकीचा खर्च परवडत नाही तसेच मुलींना परक्याचे धन मानत असल्यामुळे मुलींच्या शिक्षणावर फारसा खर्च केला जात नाही.

**हिंसाचार आणि भेदभाव :-**

सध्या शैक्षणिक संस्थांमध्ये महिला आणि मुलींवर शारीरिक आणि लैंगिक हिंसाचार हा एक महत्त्वाचा चिंतेचा विषय आहे आणि या विषयामुळे बऱ्याचश्या महिला शिक्षणापासून वंचित राहावे लागते.

या सर्व आव्हानांना तोंड देण्यासाठी शिक्षणाद्वारे महिला आणि मुलींना सक्षम करणे व्यापक धोरण राबवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रथम लिंगसमानतेला प्रोत्साहन देणे आणि महिला आणि मुलींच्या हक्काचे समर्थन करणे आवश्यक आहे .सरकारी आंतरराष्ट्रीय संस्था आणि नागरी समाज संघटनांनी महिला आणि मुलींसाठी शिक्षणाच्या समान प्रवेशनाला प्रोत्साहन देणारी धोरणे आणि कायदे तयार करण्यासाठी एकत्र काम केले पाहिजे. यामध्ये शैक्षणिक सुविधा पाठ्यपुस्तके आणि शिष्यवृत्ती यासारखी संसाधने प्रदान करणे आणि शैक्षणिक वातावरणात मुली आणि महिलांची सुरक्षितता सोनेचित करणे महत्त्वाचे आहे. शिक्षणात लिंग समानतेच्या लढाईत पुरुष आणि मुलांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे महिला आणि मुलींचे शिक्षणाचे समर्थक म्हणून पुरुषाने मुलांना सहभागी करून घेणे पारंपारिक लिंग नियम आणि रुढीनं आव्हान देण्यात महत्त्वाची भूमिका शिक्षण बजावू शकते यामध्ये जागरूकता मोहीम शैक्षणिक कार्यक्रम आणि शिक्षणात लिंग समानता आणि लिंग समानतेला प्रोत्साहन देणारे उपक्रम आपण समाविष्ट करू शकतो.शिवाय महिला आणि मुलींना शिक्षणाचे महत्त्व शिकवल्याने त्यांच्यात कृतज्ञेची भावना निर्माण होऊ शकते आणि त्यांना शैक्षणिक संधीचा पाठलाग करण्यास प्रोत्साहात केली जाऊ शकते. हे जागरूकता मोहीम मार्गदर्शन कार्यक्रम आणि समुदाय आधारित शिक्षण उपक्रमाद्वारे केले जाऊ शकते.

महिला आणि मुलींना शिक्षणाच्या प्रवेशावर मर्यादा घालणाऱ्या संरचनात्मक अडथळयांना तोंड देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये गरिबीवर मात करणे दुर्गम आणि ग्रामीण भागात शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये महिला आणि मुलींची सुरक्षितता सुनिश्चित करणे याचा समावेश होतो. रोख हस्तांतरण शिक्षण कार्यक्रम आणि पायाभूत पायाभूत सुविधा विकास यासारखे लक्षणीय कार्यक्रम राबवून हे करता येते.

**महिला सक्षमीकरणाचे महत्त्व :-**

महिला सक्षमीकरण ही एक सामाजिक अत्यावश्यकता आहे ज्याचे विविध आणि दुर्गामे परिणाम आहेत जसे

**आर्थिक वाढ :-**

भारतात सध्या औपचारिक महिला कामगार सहभाग दर फक्त 24% आहे .जो विकसनशील देशांमध्ये सर्वात कमी आहे बहुतेक भारतीय महिला अनौपचारिक क्षेत्रात काम करतात .जिथे त्यांना किमान सामाजिक सुरक्षा मिळते आणि त्यांना किमान वेतन मिळते कौन्सिल ऑन फॉरेन स्टडीज ने केलेले अलीकडील केस स्टडी मध्ये असा अंदाज आहे की जर भारतातील महिलांना औपचारिक अर्थव्यवस्थेत पुरुषा इतकेच प्रतिनिधित्व दिले गेले तर असा अंदाज आहे की 2025 पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेत 60% अतिरिक्त वाढ होऊ शकते. अर्थव्यवस्थेचा सक्रिय योगदान देणाऱ्या म्हणून भारतातील महिलांचे सक्षमीकरण केवळ आर्थिक वाढीला चालना देण्याची क्षमता नाही तर समाजातील सर्व घटकासाठी संधी निर्माण करण्याची क्षमता देखील सक्षमीकरणात आहे

**विविध दृष्टिकोन :-**

*महिलांच्या विविध दृष्टिकोनामुळे नावीन्य उपाय मिळू शकतात .तसेच सर्जनशीलता वाढवण्याची शक्यता जास्त असते. ज्यामुळे समस्या सोडवण्याची आणि निर्णय घेण्याची महिलांची क्षमता वाढते .महिलांचे हे दृष्टिकोन तंत्रज्ञानापासून ग्राहक सेवेपर्यंत आणि त्यापलीकडे असणाऱ्या उद्योगांना महत्त्वपूर्ण अंतदृष्टी देतात.

**सामाजिक प्रगती :-**

सक्षम महिला समुदाय आणि सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. आरोग्य शिक्षण आणि एकूण सामाजिक कल्याण यासारख्या क्षेत्र सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्या पुढाकार घेतात. लिंग समानता आणि सर्व महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी नेतृत्वाच्या भूमिकेत महिलांचा समान सहभाग महत्त्वाचा ठरतो.

महिला सक्षमीकरण हे एक महत्त्वाचे ध्येय आहे परंतु ते साध्य करण्यासाठी महिलांच्या विविध उपसमुहांच्या संघर्ष प्रकाश ढाकणे आणि त्यावर कृती करणे आवश्यक आहे यामध्ये महिलांची दुर्दशा महत्त्वाची आहे ज्यांना त्यांच्या लिंग आणि वयामुळे दुहेरी भेदभावाचा सामना करावा लागतो

**महिला सबलीकरणाच्या अंमलबजावणी मधील अडथळे :-**

भारतीय समाज हा एक असा समाज आहे की ज्यामध्ये विविध रितीरिवास श्रद्धा परंपरा चा समावेश होतो. ज्या भारतातील महिला सबलीकरणासाठी अडथळा ठरत आहेत जुन्या विचारसरणीमुळे अजूनही काही भागात महिलांना घरातून बाहेर पडण्यास बंदी आहे. शिक्षण आणि नोकरीसाठी घराबाहेर जाण्याचे स्वातंत्र्य नाही. जरी बाहेर पडल्या तरी कामाच्या ठिकाणी महिलांचे शोषण ही देखील महिला सबलीकरणातील एक प्रमुख अडथळा आहे. भारतात महिलांना अजूनही कामाच्या ठिकाणी लिंग पातळीवर भेदभाव केला जातो. समान वेळ समान काम करून ही पुरुषांपेक्षा खूप कमी मोबदला दिला जातो. स्त्रिया मधील निरक्षरता ही समस्या देखील महिला सबलीकरणातील मोठा अडथळा आहे. नोकरदार महिला च्या सुरक्षेच्या दृष्टीने विचार केला तर सार्वजनिक वाहतूक वापरू शकत नाहीत. खऱ्या अर्थाने महिला सबलीकरण तेव्हा साध्य होऊ शकते. जेव्हा महिलांची सुरक्षित तथा महिला ही सुरक्षित होतील आणि पुरुषाप्रमाणे त्याही निर्भयपणे कोठेही मुक्तपणे वावरू शकतील स्त्रीभ्रूणहत्या हे सुद्धा भारतातील महिला सबलीकरणाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे.

**भारत सरकारने महिला सबलीकरणासाठी राबवलेल्या उपायोजना :-**

महिला सबलीकरणासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील असते. महिलाच आवलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात त्याचा विकास व्हावा यासाठी शासनाने अनेक योजना राबवत आहे. राज्य किंवा केंद्र सरकारकडून महिलांसाठी विविध योजना राबवण्याचा मुख्य हेतू म्हणजे महिलांना त्यांना त्यांच्या पायावर उभे राहता यावे जेणेकरून त्यांना त्यांच्या कुटुंबाची व इतर मूलभूत गरजा त्यांना स्वतः भागवता येतील. या विविध बाबीचा विचार करून महिलांच्या कामाशी निगडित असणारे काम जसे शिवणकाम विणकाम अशा अनेक योजनांचा समावेश महिलांसाठी शासनाकडून करण्यात आलेला आहे. अजूनही महिलांना व्यवसायासाठी प्रवृत्त करून त्यांना स्वावलंबी बनवणे त्यांच्या सक्षमीकरणाला चालना देणे हा शासनाचा महिलांसाठी विविध योजना राबवण्याचा मुख्य उद्देश आहे.

**शासनामार्फत महिलांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजना :-**

**1. लेक लाडकी योजना :-**

महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील मुलींचे शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच मुलांचा मृत्यू दर कमी करण्यासाठी व मुलींना सशक्त प्रबळ व आत्मनिर्भर बनवण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प 2023 सादर करताना लेक लाडकी योजनाही सुरू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून गरीब कुटुंबातील म्हणजेच पिढ्या व केशरी रेशन कार्ड असलेल्या कुटुंबातील मुलींना जन्मापासून ते वयाच्या 18 वर्षापर्यंत एक लाख एक हजार रुपये देण्यात येणार आहेत मुलींना शिक्षणासाठी चालना देण्यासाठी ही महत्त्वपूर्ण योजना सुरू केली आहे.

**2. महिला उद्योगिनी योजना :-**

प्रत्येक महिलांना समाजात मानाच स्थान मिळावं तसेच विविध व्यवसायामध्ये सुद्धा महिला सक्षम व्हाव्यात यासाठी शासनाकडून फक्त महिलांसाठी या योजना सुरू करण्यात आल्य आहेत. त्यापैकी एक योजना म्हणजे ती महिला उद्योगिनी योजना आहे. ही महाराष्ट्रातील एक महिला कर्ज योजना असून या योजनेच्या माध्यमातून लघु व्यवसाय क्षेत्रातील व्यवसाय किरकोळ विक्रेते उत्पादक किंवा स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या महिलांना व्यवसाय करण्यासाठी जास्तीत जास्त तीन लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून देणे महिलांना त्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी उद्योगिनी वाढवण्यासाठी ही योजना महाराष्ट्र सरकारने सुरू केलेली आहे.

**3. स्वर्णिमा योजना :-**

स्वर्णिमा योजना ही महिला स्वयंरोजगार योजना अंतर्गत येणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. तसेच सदरची योजना न्याय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाकडून मागासवर्गीय उद्योजक महिलांसाठी राबवण्यात येते. तसेच या योजनेच्या माध्यमातून महिलांना उद्योगासाठी दोन लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येतो. महिलांना व्यवसायासाठी नॅशनल बॅकवर्ड क्लासेस फायनान्स डेव्हलपमेंट कार्पोरेशन यांच्याद्वारे कमी व्याजदरावर कर्ज उपलब्ध करून दिले जाते

**4. उद्योजक धोरण योजना :-**

पुरुषाप्रमाणेच महिलांना सुद्धा प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये समान स्थान मिळावे यासाठी शासनाकडून महिलांसाठीही कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमधून सुद्धा महिलांना त्यांच्या स्वतःचे स्थान मिळावं यासाठी शासनाकडून ही कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमधून सुद्धा महिलांना त्यांचा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी 20 लाखापासून ते एक कोटी रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. महाराष्ट्र शासनाची ही महत्त्वपूर्ण योजना आहे.

**5. महिला सन्मान योजना :-**

या योजनेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये जाहीर करण्यात आलेल्या लेक लाडकी योजनेसह महिलांसाठी विविध योजनांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये त्यामधील एक योजना म्हणजे महिला सन्मान योजना एसटी प्रवासामध्ये विशेष महिलांसाठी 50 टक्के सूट देण्याची महिला सन्मान योजना आपल्या शासनाद्वारे सुरू करण्यात आली.

**6. महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना :-**

या योजनेमध्ये जर एखाद्या महिलेच्या पतीचा आकस्मात किंवा इतर कारणामुळे मृत्यू झाला असेल अशा महिलांना समाजात वावरताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन विधवा महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी व स्वतःच्या बळावर आपला आयुष्यजगण्यासाठी राज्य शासनाच्या महिला कल्याण विभागाकडून विशेष विधवा महिलांसाठी ही विधवा पेन्शन योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेतून विधवा महिलांना दर महिन्याला 1000 रुपये पेन्शन राज्य शासनाकडून देण्यात येते.

**7. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना :-**

प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना ही केंद्र शासनाची योजना असून ही योजना महिला आणि बालविकास मंत्रालयामार्फत चालवण्यात येते या योजनेअंतर्गत जा गरोदर महिला व  ज्या स्तनदा आहेत त्यांना 5000 रुपयाची आर्थिक मदत या योजनेद्वारे केली जाते.

**8. माझी कन्या भाग्यश्री योजना :-**

ही योजना एक मे 2017 पासून महाराष्ट्र शासनाकडून मुलीचा जन्मदर प्रमाण सुधारण्यासाठी व स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी सुरू करण्यात आली.

**9. सुकन्या समृद्धी योजना :-**

ही योजना केंद्र सरकार मार्फत 22 जानेवारी 2015 पासून पालकांना आपल्या मुलांसाठी असलेली चिंता दूर करण्यासाठी शासनाकडून सुरू करण्यात आली.

**10. जननी सुरक्षा योजना :-**

जननी सुरक्षा योजने देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्याकडून गरीब कुटुंबातील गरोदर महिलांना आर्थिक मदत करण्यासाठी सुरू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून दारिद्र रेषेखाली गर्भवती महिलांना शासनाकडून 1400 रुपये आर्थिक मदत करण्यात येते.

**11. महिला समृद्धी कर्ज योजना :-**

महिला समृद्धी कर्ज योजना ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व सहाय्य विभागाकडून विशेषता महिलांसाठी राबविण्यात येणारी व्यावसायिक कर्ज योजना आहे. महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी व त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी महिला समृद्धी कर्ज योजना काढण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी पाच लाख ते वीस लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते .

**12. लाडकी बहीण योजना :-**

महाराष्ट्र शासनामार्फत 2024 च्या अंतरिम अर्थसंकल्पात त्या योजनेची घोषणा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वतीने करण्यात आली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील महिलांना प्रति महिना पंधराशे रुपये दिले जातात ही योजना महिलांना सशक्त व एक आर्थिक मदत मिळावी महाराष्ट्र शासनामार्फत सुरू करण्यात आली आहे या योजनेची सुरुवात 1 जुलैपासून सुरू करण्यात आली.

**शासनामार्फत तयार करण्यात आलेली महिलांसाठीचे कायदे :-**

महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजात महिलांना सन्मानाने जगता यावे व त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी  शासन स्तरावर कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**1. हुंडा प्रतिबंध कायदा 1961 :-**

आपल्या राज्यात 26 नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदी दिन म्हणून साजरा केला जातो .हुंडा देणे आणि घेणे या का कायद्याने गुन्हा ठरवण्यात आला आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनला हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्या ची नियुक्ती जिल्हा तसेच तालुकास्तरीय समितीची स्थापना या कायद्यांतर्गत करण्यात आली आहे.

**2. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा :-**

या कायद्यान्वये जिल्हा महिला व बालविकास अधिकारी प्रांत अधिकारी तहसीलदार नायब तहसीलदार गटविकास अधिकारी स्त्रियांसाठी शासनाने ज्या उपायोजना राबवल्या आहेत जे कायदे केले आहे त्याची महिलांना जाणीव करून देणे शासकीय व स्थानिक पातळीवर श्री सबलीकरणासाठी सापलीकरणासाठी गतिमान प्रयत्न करणे असा लढा उभारल्या शिवाय स्त्रियांसाठी अनुकूल वातावरण तयार होणार नाही. कारण आर्थिक प्रशासकीय राजकीय सामाजिक आरोग्य शिक्षण या क्षेत्रातील श्री सबलीकरणाच्या विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही.

**निष्कर्ष :-**

आज भारत शासनाद्वारे महिलांच्या सशक्ति करण्यासाठी सबलीकरणासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. महिला व बालविकास कल्याण मंत्रालय भारत सरकारद्वारे महिला सबलीकरण याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. महिलाशपाली करण्यासाठी असलेल्या या धोरणांचा व विविध योजनांचा लाभ महिलांना मिळाला तर त्या खऱ्या अर्थाने सक्षम होतील हा सर्व क्षेत्रातील महिलांकडे पाहिले तर महिला या पुरुषापेक्षा कोठेही मागे नाहीत सर्व क्षेत्रात महिला आपला वेगळा ठसा उमटवताना दिसत आहेत. तरीसुद्धा सर्व क्षेत्रात महिलांना समान संधी समान स्थान मिळवण्याकरता महिलांसाठी केलेल्या सर्व कायदेशीर तरतुदीची आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे गरजेचे आहे. तेव्हाच महिलांना समाजाचा एक परिपूर्ण घटक म्हणून समान स्थान मिळेल आणि खऱ्या अर्थाने महिला सबलीकरण होण्यास मदत होईल.

**संदर्भसूची :-**

1. भारतीय स्त्री जीवन: डॉ लीला पाटील, मेहता पब्लिशिंग हाउस कोल्हापूर.
2. हिंदू संस्कृती आणि स्त्री: आ. ह. साळुंखे. लोक वाण्मय गृह.
3. सती प्रथेचा इतिहास: ह. अ. भावे. सरिता प्रकाशन .
4. महिला सबलीकरण: प्राचार्य डॉ. संभाजी देसाई. प्रशांत पब्लिकेशन.
5. मानवी संसाधन विकास: प्रा. व्ही बी पाटील. सागर पब्लिकेशन पुणे.